दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३७ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२४ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.




# ११ हजार १११ दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला मंदिर परिसर

## महाकाली महोत्सवात दिव्यांची रोषणाई, अनुराधा पौडवाल यांच्या कार्यक्रमात अलोट गर्दी









### बाईपण भारी देवा या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फृत प्रतिसाद

**महोत्सवात बाईपण भारी देवा.. मला पण आज बोलायचं आहे... या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला व मुलींचा मोठा प्रतिसाद लाभला. महिला आणि मुलींना मुक्त व्यासपीठ मिळावे यासाठी सदर आयोजन करण्यात आले होते.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री माता महाकाली महोत्सवात गायत्री परिवाराच्या वतीने ११ हजार १११ दिवे लावत दिपोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी दिव्यांच्या रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला. तर सायंकाळी ७ वाजता युवा किर्तनकार सोपान दादा कनेरकर यांचा किर्तनाचा कार्यक्रम पार पडला. तर रात्री ९ वाजात सुप्रसिध्द गायिका अनुराधा पौडवाल यांचा भक्तीमय संगीत कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाला भक्तांची अलोट गर्दी झाली होती.माता मकाहाली महोत्सवाच्या चौथ्या दिवशी दिवसभरच विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात सायंकाळी ६ वाजता महोत्सव मंडप परिसरात गायत्री परिवारांच्या वतीने ११ हजार १११ दिवे लावत रोषणाई केले. त्यामुळे परिसर लखलखून निघाला होता. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉनसन आदींची प्रमूख उपस्थिती होती. सायंकाळी सात वाजता सोपान दादा कनेरकर यांचा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम पाहण्यासाठी विषेशत: युवकांनी मोठी गर्दी केली. तर रात्री ९ वाजता सुप्रसिध्द गायिका अनूराधा पौडवाल यांच्या कार्यक्रमाला सुरवात झाली या कार्यक्रमात भक्तांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने अनुराधा पौडवाल यांना मातेची मुर्ती देत सन्मानीत करण्यात आले.


### महोत्सवाच्या माध्यमातून आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरकरांना भक्तीचा धागा बांधला –आ. विजय वडेट्टीवार

**आमदार किशोर जोरगेवार मातेचे मोठे भक्त आहे. त्यांनी चंद्रपूरात सुरु केलेल्या महोत्सवाला विशेष महत्व असून यातून चंद्रपूरकर मातेचा जागर करत आहे. त्यांनी या महोत्सवाच्या माध्यमातून चंद्रपूरकरांना भक्तीचा धागा बांधला असल्याचे प्रतिपादन विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केले. महोत्सवाच्या चौथ्या दिवशी त्यांनी येथे भेट दिली. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने त्यांचा महाकाली मातेची मुर्ती व चुनरी देत सत्कार करण्यात आला. माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनीही महोत्सवाच्या चौथ्या दिवशी महोत्सवाला भेट देत शुभेच्छा दिल्यात यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, सचिव अजय जयस्वाल, बलराम डोडाणी, मिलिंद गंपावार, अशोक मत्ते यांच्यासह इतर सदस्यांची उपस्थिती होती.**

## अतिदुर्गम झिंगानूर परिसराला पक्क्या रस्त्यांची प्रतीक्षा ;पदाधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**सिरोंचा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पातागुडम परिसरातील नागरिकांचा गचके देई खाचखळग्यातून प्रवास अद्याप पक्के रस्ते निर्माण झाले नाहीत. या भागातील नागरिकांना कच्च्या व पायवाटेच्या रस्त्यानेच प्रवास करावा लागत आहे. अतिदुर्गम कोर्ला ते पातागुडम या १० कि.मी. रस्त्याची दैनावस्था झाली आहे. हा रस्ता पांदण खोलगट असून प्रवास करताना जणूकाही लहान ओढा किंवा नाला असल्याचाच भास होतो. पावसाचे पाणी रस्त्यावरूच वाहत असल्याने नाला की रस्ता असा प्रश्न साहजिकच पडतो.



एवढी गंभीर अवस्था असतानाही नवीन रस्ता बांधकामाकडे शासन व प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. पातागुडम गावाला लागूनच इंद्रावती नदी आहे,नदीतून बारमाही पाणी वाहते.नदीवरून उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे.उपसा सिंचन झाल्यास शेतकऱ्यांना धान पिकासाठी पाणीपुरवठा होईल. वनहक्कासाठी दावे सादर करूनही या भागातील अतिक्रमणधारकांना पट्टे मिळाले नाहीत. ही प्रक्रिया लवकर राबवावी, रमेशगुडम, किष्टव्यापल्ली, कोर्ला, पातागुडम रस्त्याचे बांधकाम करावे,पिण्यासाठी नळ योजना कार्यान्वित करावी,पातागुडम ग्रामपंचायतअंतर्गत येणाऱ्या पातागुडम, रायगुडम,पेंडालाया परिसरातील शेतकऱ्यांना सिंचन विहिरींचा लाभ द्यावा, नवीन शौचालयांचे बांधकाम करावे, गुरांसाठी गोठ्यांचा लाभ द्यावा, शेळी व दुधाळ गटाचे वाटप करावे, नवीन घरकूल मंजूर करावे, निराधाराकंना संजय गांधी योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, अपंग, सिकलसेलग्रस्तांना योजनेचा लाभ दिल्यास सुलभ होईल. त्यादृष्टीने शासन व लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र कुमरी सुनील जाकुला, पातागुडम येथील किरणकुमार दुर्गम, लक्ष्मीनारायण गोरगोंडा यांच्यासह नागरिकांनी केली आहे. विशेष म्हणजे, सातत्याने मागणी करूनही शासन सदर मागणीकडे दुर्लक्ष का करीत आहे, अशी खंतही नागरिकांनी व्यक्त केली आहे.कोर्ला ते पातागुडम मार्ग कच्चा आहे. सदर मार्गाची झीज झाल्याने दरवर्षीच्या पावसात तो वाहून गेला. आता तो खोलगट झाला आहे. पावसाळ्यात येथूनच पाणी वाहते. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास मार्गावरील रहदारी ठप्प होत अनेकदा ही स्थिती निर्माण होते.चिखलातूनच नागरिक प्रवास करतात. त्यामुळे सदर भागांचे खडीकरण होणे आवश्यक आहे.

### मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आरक्षण देऊ–फडणवीस

नागपूर–मराठा आरक्षणाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेल्या ४० दिवसांची मुदत उद्या २४ ऑक्टोबरला संपत आहे. अशातच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात बोलताना मराठा समाजाच्या हक्काचे संविधानाच्या चौकटीत आणि न्यायालयीन प्रक्रियेत टिकणारे आरक्षण देणार असल्याचे स्पष्ट केले.मराठा आंदोलकांशी समन्वयाचे प्रयत्न सुरू आहे. जटील आणि गुंतागुंतीचे प्रश्न, विशेषत: संविधान आणि न्यायपालिकेचा सहभाग असलेले प्रश्न घाईघाईने सोडवता येत नाही. यामध्ये शेवटी विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागतो. घाईघाईत घेतेलेला निर्णय उद्या न्यायालयात टिकला नाही तर पुन्हा समाजाला मूर्ख बनवण्याकरिता निर्णय घेतल्याची टीका होईल. म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी टिकणारा निर्णय घेऊ असे स्पष्टपणे सांगितले आहे.मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यासाठी विशेष अधिवेशनाची मागणी होत आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न अतिशय गंभीर आहे. मागच्या काळात आमच्या सरकारने दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकले होते हे सर्वांना माहिती आहे. तामीळनाडूनंतर उच्चन्यायालयात आरक्षण टिकणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य होते. आमचे सरकार असेपर्यंत सर्वोच्च न्यायालयात स्थगिती आली नाही. मात्र त्यानंतर घडलेल्या घटनांच्या राजकारणात जायचे नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देऊ असे स्पष्टपणे सांगितले आहे. आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी ताकतीने उभे राहोओबीसी जनगणनेबाबत अजित दादा नेमकं काय म्हणाले याची मला कल्पना नाही. पण ओबीसी जनगणनेच्या मागणीबाबत सरकारची भूमिका मागेच स्पष्ट केली आहे. सरकारने यासाठी कधी नकार दिलेला नाही. कारण आता बिहारमध्ये तयार झालेल्या अडचणी आपल्याकडे तयार होणार नाही याची काळजी घेऊन निर्णय घ्यावा लागेल. मागासवर्गीय आयोगाच्या पुनर्स्थापनेची मागणी होत आहे. त्या बाबत मुख्यमंत्री निर्णय करतील. आवश्यकता असल्यास पुनर्स्थापना निश्चितपणे केली जाईल. किंवा रिक्त जागा भरण्यात येईल.




## वार्डातील अंधार दूर करण्यासाठी राष्ट्रवादीचा पुढाकार

**मुल । प्रतिनिधी**

शहरातील वार्ड क्रमांक १२ मध्ये नागोसे यांच्या घरापासून ते नखाते यांच्या घरापर्यंत नवीन विदयुत लाईन टाकलेली आहे .परंतु नगर परिषद नें मागील अंदाजे दोन वर्षां पासून तिथे पथ दिवे न लावल्या मुळे अंधारात चाचपडत वॉर्डातील नागरिकांना त्या भागातून ये जा करावे लागत आहे. अंधाराच्या समस्येमुळे वडिलधारी नागरिक,रात्रौ कामावरून येणारे नागरिक महिलांना त्रासाला समोरे जावे लागत आहे.



सदर चा भाग मुलं शहरचा शेवटचा भाग असल्यामुळे अन्य जीवापासून सुद्धा अंधारामुळे धोका उत्पन्न होण्याची शक्यता गृहीत धरून आज मुलं नगरपालिका येथे विदयुत विभागाचे विभाग प्रमुख इंजि. प्रतीक ढोंगे यांची भेट घेत वॉर्ड क्रमांक १२ च्या नागरिकांना पथ दिवे नसल्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्येची जाणीव करून देण्यात आली. त्यांना तात्काळ पथदिवे लावून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आली.गरपालिकेच्या वतीने तात्काळ या समस्येची सोडवणूक करण्याचे आश्वासन इंजि. प्रतिक ढोंगे यांनी दिले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुलं तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार, मुलं शहर अध्यक्ष आकाश येसनकर, रजत कुकडे, तुषार घ्यार, कृष्णा बोरेवार, सौरभ वायडे उपस्थित होते.

# हमीपेक्षा भाव कमी


**सोयाबीन आणि कापसाच्या हमीभावापेक्षा कमी भावाने शेतकऱ्यांना शेतमालाची विक्री करावी लागत असल्याचे ऐकायला येत आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे का असेना शेतमालाला हमीभाव मिळत नसल्याने कितीही पिकवले तरी पळसाला पाने तीनच अशी शेतकऱ्यांची अवस्था आहे. सोसून सोसून किती सोसायचे? किती दिवस नुकसानीत व्यवसाय करायचा? तुटीच्या व्यवसायाने हवालदिल होऊन अखेर एक दिवस शेतकऱ्यांना स्वत:चा परिवार गमवावा लागतो. शेतकरी होणं हे खरोखर शापीत जीवन आहे.**






यानिमित्ताने एक गोष्ट आठवली. ती आज यानिमित्ताने सांगावीशी वाटते. एके दिवशी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वरती विचार मंथन करण्यासाठी भारत, पाकिस्तान व चीन देशातील शेतकऱ्याचे खंडपीठ बसले. त्यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आपापसात चर्चा झाली. परंतु त्या चर्चेतून प्रश्न सुटला नाही. त्यावेळेस त्या तिन्ही देशातील शेतकऱ्यांनी असे ठरविले की, आपण हे प्रश्न घेऊन ब्रह्मदेवाकडे जाऊ. तीनही शेतकरी ब्रह्मदेवाकडे गेले आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर देवासमोर भांडू लागले. त्यावेळेस देवाने सांगितले की, भांडू नका. प्रत्येकाने मला एक प्रश्न विचारा. पहिला प्रश्न पाकिस्तानच्या शेतकऱ्याने विचारला. तो म्हणाला, देवा माझ्या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी व्हायला किती दिवस लागतील. त्यावेळेस देवाने सांगितले की आणखी ७० वर्षे लागतील. त्यावेळेस पाकिस्तानचा शेतकरी रडू लागला. देवाने विचारले की तू का रडतोस? त्यावेळेस त्यांनी सांगितले की, जर ७० वर्षे लागणार असतील तर ते बघायला मी जिवंत असणार नाही म्हणून मला रडू आले. दुसरा प्रश्न चीनच्या शेतकऱ्यांनी विचारला. माझ्या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कधी कमी होणार? त्यावेळी त्यालाही देवाने सांगितले की, ७० वर्षे लागतील. तोही रडू लागला. देवाने विचारले तू का रडतोस? त्यावेळेस त्याने सांगितले की ते बघायला मी जिवंत असणार नाही म्हणून मला रडू आले. शेवटचा प्रश्न भारताच्या शेतकऱ्याने विचारला. माझ्या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कधी कमी होणार? त्यावेळेस साक्षात देवाच्या डोळ्यातून पाणी आले. त्यावेळी भारताच्या शेतकऱ्याने विचारले की देवा तू का रडतोस? त्यावेळी देवाने सांगितले की, ते बघायला मिच जिवंत असणार नाही म्हणून रडायला आले. साक्षात देवच जिवंत राहणार नसतील तर प्रश्न पडतो की शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार कधी? हे आठवण्याचे कारण म्हणजे कापूस व सोयाबीनचे दर घसरलेले आहे. हमी पेक्षा कमी भाव मिळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला असून काय करावे असा प्रश्न त्याच्या डोक्यात पडलेला आहे. जशीजशी महागाई वाढते तसेतसे शेतमालाचे भाव वाढणे अपेक्षित होते. मात्र यावर्षी कापूस आणि सोयाबीनच्या बाबतीत चित्र वेगळेच ऐकायला मिळत आहे. दसऱ्याला कापूस खरेदीच्या मुहूर्ताला शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ९ हजार रुपये ते ९ हजार १०० रुपये भाव मिळाला होता. मात्र यावर्षी २४ सप्टेंबरला काही ठिकाणी सुरू होणाऱ्या कापसाच्या खरेदीचा मुहूर्त ठरला असून खरेदीचा भाव प्रतिक्विंटल ७ हजार १०० रुपये राहणार असल्याची माहिती आहे. म्हणजे मागील वर्षाच्या तुलनेत दोन हजार रुपयांनी भाव कमी मिळणार आहे मिळणार आहे. गेल्या वर्षी सुरुवातीला सोयाबीनचा भाव ५ हजाराच्यावर भाव मिळाला होता. यावर्षी अनेक ठिकाणी ४ हजार ते ४ हजार १०० पेक्षा जास्त भाव शेतकऱ्यांना मिळत नाही. आधीच नैसर्गिक आपत्तीने त्रस्त असलेला शेतकरी त्याच्या मालाला हमीभाव मिळत नसल्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत येण्याची शक्यता आहे. शेतमालाला लावलागवड करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्च होत असल्याने जवळचा होता नव्हता पैसा मालाला भाव हमीभाव मिळेल या अपेक्षेने लावतात. जेव्हा पीक हातामध्ये येते व ते बाजारपेठेत विकायची पाळी येते तेव्हा मात्र अतिशय नगण्य असा भाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची दोन्हीकडून लूट होत आहे. शेती व्यवसायच असा आहे की तो बेभरोशाचा व्यवसाय आहे. कितीही मेहनत केली तरी शेवटी निसर्ग साथ देईलच याची गॅरंटी नाही. शेतमाल पिकला तरी सरकार त्याला योग्य व हमीभाव देईल याची गॅरंटी नाही. एकीकडे कर्ज काढून शेती करायची आणि दुसरीकडे मातीमोल भावाने शेतातील पिकवलेला घामाचा माल मातीमोल भावाने विकायचा. हे दृष्टचक्र सुरू आहे.समीकरण न जुळणारे आहे. आज दसरा आहे. काही दिवसांमध्ये दिवाळी येणार आहे. आधीच अतिवृष्टीने त्रस्त झालेल्यांना नुकसानीची शासनाकडून मदत मिळाली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या घरी पैशाची चणचण आहे. ज्या शेतकऱ्यांची मुले शाळा कॉलेजमध्ये शिकतात. त्यांना मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी जवळचे पैसे खर्च करून शिकवावे लागत आहे. अनेकांनी आपल्या पाल्यांना दिवाळीत चांगले कपडे घेऊन देण्याचे आश्वासन दिले आहे. दिवाळसण चांगल्या पद्धतीने साजरा करू असे सांगितले होते. परंतु खिशात पैसे नसल्याने मुलांसमोर शेतकरी पालकांना उघडे पडावे लागत आहे. शेती व्यवसाय सतत तोट्यात चालणारा असल्याने शेतकरी आशेवर जगतो. खिशात पैसा नाही. समोर सण आहे. शेवटी काय करणार आहे त्या बिचाऱ्याला दुसरा पर्याय शिल्लक नाही. शेतमालाचे भाव का पडले या संदर्भामध्ये काही शेतकरी तज्ज्ञ सांगतात की, जागतिक पातळीवर कापसाच्या व्यवसायात असलेली मंदी येण्याचे मुख्य कारण म्हणजे पूर्वी युक्रेन आणि रशिया आणि आता इस्त्रायल व पेलेस्टाईन युद्धामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये कापसाचे भाव जास्त वाढणार नसल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. जागतिक बाजारपेठेमध्ये कापसाचे भाव कमी असल्याने गेल्या वर्षापेक्षा यावर्षी कापसाला भाव कमी राहणार आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे कापसाचे भाव वाढण्याची सूत्राम शक्यता नसल्याने भाव पडलेले आहे. शेवटी काही कारण असले तरी शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारी धोरण असतं. सरकार कुठलेही असो. शेतकऱ्यांना मेल्याशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्याचा जन्म काय नुसता मरण्यासाठी झाला की काय? इतरांना ज्याप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे तसा शेतकऱ्यांनाही जगण्याचा अधिकार असू द्या. शेतकरी तुम्हाला भीक मागत नाही. स्वतःच्या कष्टाने कमवलेल्या पिकाची किंमत मागतो. तेव्हा राज्यकर्त्यांनो जनाची नाही तर निदान मनाची ठेवून तरी शेतकऱ्यांच्या मालाच्या किमती पडणार नाही याची काळजी घेत शेतमालाला रास्त भाव मिळवून द्या.

# भगवान बुध्दाचा धम्म मानवतेकडे




भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून या मधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. डॉ. बाबासाहेबांनी सर्वार्थाने आपला मानला तो अवैदिक, निरीश्वरवादी, अनात्मवादी, भौतिकवादी, तत्वज्ञ-आदिम, साम्यवादी गणसंस्थेशी जीवंत नाते सांगणारा शाक्य गौतम, करुणाघन, मध्यममार्गी, समतावादी, विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतीकारी महामानव म्हणजेच धर्म संस्थापक महात्मा तथागत भगवान गौतम बुध्द ! सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये. तद्प्रसंगी सिध्दार्थाने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीर्याने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्यासाठी स्नान एक साधन असते. फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दु:ख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न-वस्त्र-निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळविलेल्या ज्ञान चिंतनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवन मार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडविण्यास मदत होते. हा संदेश संपुर्ण विश्वाला तथागताने दिला.



**प्रविण बागडे**
**नागपूर,९९२३६२०९१९**

व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे-ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित-ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षण ज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासच राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने. भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्या प्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीमत्वाने प्रभावित झालेले होतेच. परंतू त्याही पेक्षा किती तरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते. दलित तरुण (आंबेडकरवादी) हा अधिक पुरोगामी व विज्ञाननिष्ठ बनतो आहे, याचे कारण धर्मांतर आहे. याला राजकिय स्वार्थासाठी गेली ४० वर्षे जाति-धर्माच्या जाळयात अडकवून ठेवण्याचा प्रयत्न होत असला तरीही बंधने झुगारुन देणारी वृत्ती दलित तरुणांमध्ये वेगाने वाढत आहे. याला साक्ष म्हणजे १९७२ नंतरची केवळ दलित तरुणांची आंदोलने आहेत.भगवान बुध्दांच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दीवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मान पुर्वक विनम्र होत असते. बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दीवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त-दिपो-भव, अत्त-विरहत, अत्त-सरणा अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुसऱ्या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.लॉकडाऊनच्या काळात ज्यांचे हातावरील पोट आहेत, अशा गरजू लोकांच्या भोजनाची व्यवस्था करतांना अनेक लोक किंवा संस्था दिसत होत्या. अनेक लोक अडचणीत सापडले असतांना, त्यांना सर्व प्रकारची मदत करतांना दिसत होते. ही मदत करतांना कुणीही जात, धर्म विचारला नाही, फक्त माणूसकी धर्म पाळत होते. धार्मिक श्रध्दा व विश्वास हा मिथ्या आहे, विज्ञान व मानवतावाद आणि माणूसकी सत्य आहे हेच सिध्द होते. म्हणूनच माणसाने माणसाशी कसे वागावे याचा आदर्श घालून देणारा बुध्दांचा धम्म श्रेष्ठ आहे आणि तोच जगात शिल्लक राहील.बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निर्मळ पाण्याच्या प्रवाहा सारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता. जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द-बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध् करुन दिला आहे. मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द-धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. ६७ व्या धम्मक्रांतीच्या समस्त जनतेला मन:पूर्वक शुभेच्छा !

# २२८४ वी अशोक विजया दशमी निमित्याने



बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशोक विजयादशमीच्या शुभ दिनी १४ ऑक्टोबर १९५६ ला आदरणीय पूज्य भंते चंद्रमणी महास्थवीर यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा घेतली नंतर आपल्या पाच लक्ष कुटुंबप्रमुख अनुयायांना नागपूर दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची धम्मदीक्षा घेऊन ऐतिहासिक धम्मक्रांती केली.

त्रिवार पवित्र अशा या महान दिवशी इतिहासामध्ये तीन अविस्मरणीय अशा फार मोठ्या घटना घडलेल्या आहेत. पहिली घटना प्रियदर्शी सम्राट अशोक त्यांचा धम्म विजय व दसरा - अशोक विजया दशमी या उत्सवाची सुरुवातदुसरी घटना बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सपत्नी बौद्धधर्मामध्ये प्रवेश व बौद्ध धम्माचा स्वीकार आणि तिसरी घटना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरपाच पाच लाख कुटुंबप्रमुख अनुयायांना दीक्षाभूमी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा व २२ धम्म प्रतिज्ञा पाळण्यासंबंधीचा शपथविधी सोहळा. दसरा - अशोक विजया दशमी बौद्ध धम्मियांचा पूजनीय व पवित्र सण, शुभ व मंगल दिन, मानवाच्या दुःख मुक्तीचा दिवस, धम्मविजयाचा आदर्श दिवस, बौद्ध साहित्यामध्ये सर्वात मोठे महत्त्व असलेला दिवस, एक आदरणीय व अनुकरणीय दिवस, समता, स्वात्र्यंतता बंधुता व मैत्रीच्या संगमाचा दिवस, अससत्यावर सत्याचा विजय दिवस, क्रूरतेवर व पशुतेवर सतधम्माचा विजय दिवस होय.



**प्रा.रवि कांबळे,**
**चंद्रपूर**

बौद्ध इतिहासामध्ये दसरा - अशोक विजयादशमी चा सण हा फार प्राचीन असून इतिहासप्रसिद्ध आहे . राजा बिंदुसार व माता सुभंद्रागीपुत्र यांचा पुत्र अशोक यांचा जन्म इ. स. मपूर्व ३०४ला झाला. अशोकाला पाच पत्नी होत्या. नामे देवी उर्फ महादेवी (विदिशा) असंघमित्रा, चारुवाकी पद्मावती आणि तिष्यरक्षिता. त्यांचा वडीलासमक्ष राज्याभिषेक हा इ. स. पूर्व २७३ ला झाला. चार वर्षे भावासोबत संघर्ष करून, त्यांना संपवून त्यांचा दुसरा खरा राज्याभिषेक इ. स. पूर्व २६९ ला झाला. आठ वर्षानंतर कलिंग युद्ध बौध्द राजा सारवेल सोबत इ. स. पूर्व २६१ ला झाले . यानंतर शस्त्राचा त्याग , युद्धाला तिलाजंली बौद्ध धम्मात दीक्षा प्राप्त व पुढे आजीवन धम्माचा प्रचार प्रसार करून बुद्ध धम्माला विश्वधर्म बनविणारा महान सम्राट प्रियदर्शी सम्राट अशोक राज्याभिषेकाच्या २० व्या वर्षी इ. स. पूर्व २३९ ला अहर्त मोगलीपुत्त तिष्य यांच्यासोबत लुंबिनी भेट. अशोकांनी चाळीस वर्षापर्यंत जंबूद्विपवार राज्य केले. अठ्ठावरवीस वर्षे बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार केला . पाटलीपुत्र उज्जैन तक्षशिला सुवर्णगिरी गिरणार आणि कलिंग या त्यांच्या सहा राजधान्या. सुप्रसिद्ध इतिहासकार सेंट ए. स्मिथ म्हणाले की , मौर्य साम्राज्याचा विस्तार एवढा मोठा होता की, मोगल व इंग्रजाना सुद्धा ते जिंकणे अशक्य झाले. सम्राट अशोक ७१ वर्षे जगले. आणि इ. स. पूर्व २३३ ला मृत्यूला प्राप्त झाले. शेवटच्या काळामध्ये अंगावर चिवर धारण करुन राज्यकारभार केला व ते बनले राजा भवतू धम्मिको !

# प्रतिकुटुंबाला आता १२०० रुपयांची पाणीपट्टी

**सोलापूर :** जिल्ह्यातील ८५५ गावांमध्ये जलजीवन मिशन राबविले जाणार असून त्यासाठी मंजुरी मिळालेली आहे. त्यासाठी तब्बल ८३३.५६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. सध्या ८३० गावांमध्ये योजनेअंतर्गत कामे सुरु आहेत. योजना कार्यान्वित झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला योजनेच्या खर्चावरून अंदाजे बाराशे ते दीड हजार रुपयांची वार्षिक पाणीपट्टी आकारली जाणार आहे. पाणीपट्टीतून वसूल होणारी रक्कम त्याच योजनेच्या देखभाल-दुरुस्तीवर खर्च केली जाणार आहे.

ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांसह दुर्गम भागातील कुटुंबाला पिण्याचे स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर नल हे जल' असे जलजीवन मिशन राबविले जात आहे.सोलापूर जिल्ह्यातील ८५५ गावांमध्ये ही योजना मंजूर झाली असून त्यातील २५ गावांमध्ये अडथळे असल्याने त्यावर मार्ग काढला जात आहे. सध्या ८३० गावांमध्ये योजनेअंतर्गत कामांना सुरवात झाली आहे. २०२४ पर्यंत देशातील प्रत्येक घरापर्यंत पिण्याचे शुद्ध पाणी पोचविले जाणार आहे. तसेच अंगणवाडी व शाळांनाही योजनेतून नळजोडणी मिळणार आहे.दरम्यान, प्रत्येक गावातील योजना कार्यान्वित करायला येणाऱ्या खर्चावर त्या गावातील प्रतिकुटुंब पाणीपट्टी निश्चित होणार आहे. साधारणतः: बाराशे रुपये ते दीड हजार रुपयांची वार्षिक पाणीपट्टी प्रत्येक कुटुंबाला भरावी लागणार आहे. पाणीपट्टीतून जमा होणाऱ्या रकमेतून या योजनेची भविष्यातील देखभाल-दुरुस्ती अपेक्षित आहे.सोलापूर जिल्ह्यातील ८५५ गावांमध्ये यापूर्वी ही योजना मंजूर झाला असून त्यासाठी ८३३.५६ कोटींचा खर्च होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात आता १३४ गावांमध्ये योजनेला मंजुरी मिळाली आहे.निविदा प्रक्रिया राबवून मक्तेदार निश्चित होईल आणि त्यानंतर त्या गावांमध्येही योजना कार्यान्वित होईल. पुढील वर्षीपर्यंत सर्व गावांमधील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे पिण्याचे शुद्ध पाणी देण्याचे ठोस नियोजन जिल्हा परिषदेने केले आहे.जलजीवन मिशनअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला नळ कनेक्शन मिळायलाच हवे. प्रत्येक व्यक्तीला आता दररोज ५५ लिटर पाणी मिळणार आहे. दरम्यान, गावच्या योजनेवरील खर्चानुसार प्रतिकुटुंब वार्षिक किमान १२०० रुपयांची पाणीपट्टी आकारली जावी.त्यापेक्षा कमी पाणीपट्टी नसणार आहे. सध्या वार्षिक ३०० रुपयांची पाणीपट्टी आकारली जाते. तसेच आता नवीन योजनेनुसार व्यावसायिकांना व्यावसायिक दराने पाणीपट्टी आकारली जाईल. त्यादृष्टीने जिल्हा परिषदेकडून सर्व ग्रामसेवकांना आदेश देण्यात आले आहेत.

# वरिष्ठांची तक्रार केली म्हणजे अखंडता भंग पावते का ? उच्च न्यायालयाचा चंद्रपूर जिल्हा परिषदेला सवाल

## चिमूर पंचायत समितीमधील कर्मचाऱ्यांच्या निलंबन आदेशाला स्थगिती चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या कारभारावर उच्च न्यायालयाचे कडक ताशेरे

**शंकरपूर**–सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांना शिस्तभंग केला म्हणून चौकशीसाठी निलंबित करणे हि एक सर्वसामान्य बाब आहे मात्र अशाच सामान्य दिसणाऱ्या एका प्रकरणात कर्मचाऱ्यांच्या हक्काचा आणि संविधानिक अधिकाराचा तसेच सुडभावनेने निलंबन केल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय यानीं राज्य सरकारला तसेच चंद्रपूर जिल्हा परिषदेला एखाद्या कर्मचाऱ्याने वरिष्ठाची तक्रार केली म्हणून त्याने सेवेतील अखंडतेचे उल्लंघन होते का ? या प्रश्नावर शपथपत्र दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत.

चिमूर पंचायत समिती मधिल विस्तार अधिकारी उराडे यानी चंद्रपुर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे कर्मचाऱ्यांची बिंदु नामावली नियमबाह्य पध्दतीने तैयार करत असल्याची तक्रार आयुक्ताकडे केली होती. या तक्रारींची दखल घेत आयुक्तांनीही चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यानीं बिंदु नामावली निट करावी जे दोषी आढळतील त्यांचेवर कार्यवाही करावी असे समज देणारे आदेश दिलेले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कारणामुळे नाराज होवून वरिष्ठाकडे तक्रार करुन कामकाजात व्यत्यय आणला तसेच पदावर नसतांना पदाधिकारी भासवून तक्रारी केल्या त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियम ३ चा भंग झाला आहे या कारणाने विस्तार अधिकारी देवा उराडे यानां निलंबित करुन राजुरा येथे जाण्याचे आदेश काढले होते.या आदेशाला उराडे यानीं अधिवक्ता भुपेश वामनराव पाटील यांचे माध्यमातून उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका दाखल करून आव्हान दिले होते. सदरची याचिका दिनांक १९/१०/२०२३ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्रकुमार उपाध्याय व नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायाधीश अतुल चांदूरकर यांच्या युगलपिठापुढे सुनावणीसाठी आली असतांना याचिकाकर्त्याचे अधिवक्ता भुपेश पाटील यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीबाबत तसेच कार्यवाहीबाबत कर्मचारी युनियनचा पदाधिकारी या नात्याने तक्रार केल्यास ते महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा नियम ३ चा अन्वये अखंडता व कर्तव्यनिष्ठता या तत्वाचे उल्लंघन होत नाही तर अशामुळे कुठल्याही शासकीय सेवेत कार्यरत संघटनेचे पदाधिकारी यांचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न होइल व तो संविधानिक अधिकाराच्या उल्लंघनाचा प्रकार होइल तसेच सदरचा आदेश हा न्यायसंगत नसुन पुर्वग्रहदुषीत आहे व केवळ कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या चुका लक्षात आणून दिल्याच्या रागावरुन कर्मचाऱ्यांना त्रास देण्याकरिता चंद्रपूर जिल्हा परिषदेने निलंबन करण्याचा निर्णय घेतला आहे वास्तविक पाहता ज्या नियमाचे संदर्भाने निलंबन केले त्या नियमात हे प्रकरण लागु होत नाही असा युक्तिवाद केला होता.न्यायालयाने याचिकाकर्त्याचे वकील भुपेश पाटील यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर व यावर राज्य सरकारचे उच्च न्यायालयातील सरकारी अधिवक्ता अशिरगडे यांचे म्हणणे ऐकल्यानंतर पारित आदेशात निलंबन आदेश पूर्वग्रहदूषित दिसत असुन केवळ कर्मचाऱ्यांनी तक्रार केल्याच्या आकसातुन कर्मचाऱ्यांना त्रास देण्याच्या हेतुन हा आदेश पारित केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांची तक्रार केली या कारणासाठी कुठलीही मोठी शिक्षा देता येवू शकत नाही असे मत नोंदवत उच्च न्यायालयाने चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या कारभारावर कडक ताशेरे ओढलेले आहेत. उच्च न्यायालयाने निलंबन आदेशाला स्थगिती दिलेली असून अशा प्रसंगात कर्मचाऱ्यांने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या विरुद्ध त्यांच्या वरिष्ठाकडे तक्रार केल्यास खरेच कायद्याचा भंग होतो का या उच्च न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नाचे जिल्हा परिषद काय उत्तर देते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. न्यायालयाने चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून पारित निलंबन आदेशाला स्थगिती प्रदान केली असुन कर्मचाऱ्यांला त्याचे आस्थापनेवर कार्य करु द्यावे असे आदेश दिलेले आहेत. या प्रकरणात याचिकाकर्त्याचे वतीने उच्च न्यायालयात अधिवक्ता भुपेश पाटील यांनी तर राज्य सरकारतर्फे सरकारी अधिवक्ता अशिरगडे यांनी कामकाज पाहिले.

# दहावी नापास होवून चुकलेल्या आयुष्याची दिशा, डेकोरेशन व्यवसायाने बदलली

**मंगळवेढा :** घरची परिस्थिती गरीबी असल्यामुळे वडीलांना मंगळवेढा सोडावा लागला पण परिस्थितीमुळे दहावी नापास होऊन नाउमेद न होता.डेकोरेशन व्यवसायात शिवाजी डांगे यांने नाव लौकीक मिळवला.तो मुळचा मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगाव असून डेकोरेशन व्यवसायात नावलौकिक मिळवला.नवरात्र महोत्सव विधिमंडळाच्या मंडळाच्या मंडळाच्या वतीने भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता विविध देखावे उभा करण्यात आलेले आहेत यंदा सराफ गल्ली येथील नव महाराष्ट्रात तरुण मंडळाने उभा केलेला केदारनाथ मंदिराचा देखावा पाहण्यासाठी जिल्हा सह शेजारच्या जिल्ह्यातील नागरिकांची मोठी गर्दी झाली आहे.या केदारनाथ मंदिराची उभेहूब प्रतिकृती उभा करणारे डेकोरेशन डिझायनर हे शिवाजी डांगे मूळचे मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगावचे परंतु वडिलांना रोजगाराची साधन नसल्यामुळे ते कोल्हापूर येथील साखर कारखान्यात बैलगाडीतून ऊस वाहतूकीचे काम करण्यासाठी त्यांना मंगळवेढा सोडावा लागला. त्यामुळे पूर्ण कुटुंब कोल्हापूर जिल्ह्यात रहिवासी झाले.१९९६ साली दहावी नापास झाल्यानंतर शिवाजी डांगे च्या शिक्षणाची दिशा चुकली.गरीब परिस्थिती सामना करताना सुरूवातीला केटरिंग व्यवसायात कामास सुरूवात केली.पण हे काम करताना एखाद्या कार्यक्रमात सुरूवातीला जावून शेवटी तो कार्यक्रम संपल्यानंतर सर्व भांडी धुल्यावर घरी यावे लागत होते.मात्र अशा कार्यक्रमात डेकोरेशन वाला सगळ्यात उशिरा येवून आदी जातो.म्हणून या व्यवसायात काम करण्यास सुरूवात केली.सांगली येथील डेकोरेशन वाल्याकडे मजूर म्हणून काम करण्यास सुरूवात केली.पण काम पाहून सहकार्य केल्याने २०१६ पासून स्वताहून हा व्यवसाय सुरू केला आतापर्यंत राजस्थान, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, तामीळनाडू,उत्तरांचल येथील १४ नामवंत मंदीराचे डेकोरेशन सेट तयार केले.सदरचे काम अवघड असले तरी कलाकार वेळेत करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.तर लग्न समारंभासाठी २० स्टेजचे साहित्य उपलब्ध केले.यासाठी १५ कामगार कायम स्वरूपी कार्यरत आहेत.मंडप व्यवसायात भाळवणी येथील तानाजी वाडेकर यांना यांनी मदत केली.तुझ्यात जीव रंगला या मालिकेतील विवाह सोहळ्याचा स्टेज पासून सुरूवात केली.नागरिकांचा प्रतिसाद मिळालेला मंगळवेढ्यात उभारलेला केदारनाथ मंदीराचा देखावा दुसऱ्यांदा माझ्या जन्मभूमीत उभारला.भविष्यात राम मंदीराची प्रतीकृती तयार करण्यांचा संकल्प आहे.मंदीर उभारणीचे काम अवघड असले,नागरिकांतून प्रतिसाद चांगला मिळतो.भविष्यात चित्रपटासाठी आवश्यक असणारे सेट तयार करण्याचा संकल्प आहे.

# सांगोला तालुक्यात प्रथमच आयोजित केलेल्या गरबा दांडिया स्पर्धेला उदंड प्रतिसाद

**सांगोला**–भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत मित्र परिवाराच्या वतीने छ.शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर सांगोला संचलित दांडिया गरबा नाईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सांगोला तालुक्यात पहिल्यांदाच आयोजित केलेल्या दांडिया गरबा नाईट स्पर्धेला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.



भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत मित्र परिवाराच्या वतीने छ.शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर सांगोला संचलित दांडिया गरबा नाईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दांडिया गरबा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरच्या स्पर्धा २२, २३ आणि २४ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट दांडिया जोडी ७००१ रुपये बक्षीस, सर्वोत्कृष्ट गरबा जोडी ७००१ रुपये बक्षीस, सर्वोत्कृष्ट दांडिया ग्रुप ७००१ रुपये बक्षीस, सर्वोत्कृष्ट दांडिया ग्रुप ७००१ रुपये बक्षीस अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या महिलांसाठी लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. २२ ऑक्टोंबर रोजी आटा चक्की, मायक्रो ओव्हन, मिक्सर, २३ ऑक्टोंबर रोजी तीन अँड्रॉइड मोबाईल, २४ ऑक्टोंबर रोजी ३ पैठणी साडी अशी लकी ड्रॉ बक्षिसे देण्यात येणार आहेत. २२ ऑक्टोंबर रोजी गरबा दांडिया नाईट स्पर्धेचे मोठ्या उत्साहात उद्धाटन करण्यात आले. गरबा दांडिया स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला. नागरिकांनी गरबा दांडियाचा मनमुराद आनंद लुटला. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणामध्ये पहिल्या दिवशी कार्यक्रम पार पडला. छ.शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर सांगोला या मंडळाने आतापर्यंत अनेक सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. या दांडिया गरबा नाईट स्पर्धा यशस्वी करण्यासाठी छ.शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

# हुंडा घेणार नाही व देणार नाही! या विचाराने घेतलेला वधू वर मेळावा समाजाला दिशा देणारा -रुपाली चाकणकर

**अहमदनगर**–मुलीला स्वत:च्या पायावर उभे करुन तिला कर्तुत्व सिद्ध करू द्या. मुलींच्या लग्नासाठी बाजाराच्या घोड्यावर तिचा लिलाव होऊ देवू नका. मुलगी कर्तुत्ववान, सक्षम व आर्थिक संपन्न झाल्यास तिच्यावर अन्याय करण्याचे धाडस कोणाचे होणार नसल्याचे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर यांनी केले. तर महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा आदर्श समोर ठेऊन हुंडा घेणार नाही व देणार नाही! या विचाराने घेतलेला वधू-वर मेळावा समाजाला दिशा देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरात माळी समाजाच्या राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, २२ ऑक्टोबर रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय टिळक रोड येथे हा मेळावा संपन्न होणार आहे. जनवार्ता, जय युवा अकॅडमी, माळी महासंघ, श्री संत सावता माळी युवक संघ, फिनिक्स सोशल फाउंडेशन, समृद्धी महिला संस्था, रयत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित वधु-वर परिचय मेळाव्याप्रसंगी चाकणकर बोलत होत्या.माजी नगरसेवक ड. धनंजय जाधव, प्रा. माणिक विधाते, जनवार्ताचे पोपट बनकर, ड. महेश शिंदे, माळी महासंघाचे गणेश बनकर, प्रा. सिताराम जाधव, शेखर होले, नितीन डागवाले, अॅड. सुनिल महाराज तोडकर, मंगल भुजबळ, नगरसेविका वंदनाताई ताठे, जयश्री शिंदे, ज्योती





व्यवहारे, संजय फुलसौंदर, प्रयागाताई लोंढे, जयश्री व्यवहारे, राजेंद्र झोडगे, सुभाष गोंधळे, नंदकुमार नेमाने, संदीप दळवी, जालिंदर बोरुडे, उषा चौरे, दिनेश शिंदे, अविनाश शिंदे, जयेश शिंदे, संभाजी कोकाटे, सविता बनकर आदींसह माळी समाज बांधव व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.पुढे बोलताना चाकणकर म्हणाल्या की, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा विचार जगवायचा असेल तर त्यांनी आचरणात आणलेले कृत्य व विचार पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वांना हातभार लावावा लागेल. सावित्रीबाई फुले यांनी सर्व महिलांच्या कल्याणासाठी कार्य केले. त्यामुळे सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. मात्र आजही सावित्रीच्या लेकीवर अन्याय अत्याचार होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महिला आयोग पुरुषांविरोधात नाही, महिलांच्या न्याय, हक्कासाठी कार्य करत आहे. कुटुंब म्हणजे काय? सर्व एकत्र येतात तेच कुटुंब. विभक्त कुटुंब व्यवस्थेत कुटुंब संस्था टिकली तर समाजव्यवस्था टिकणार असल्याचे त्यांनी सांगितले.सत्यवानाची सावित्री कोणी पाहिली नाही. मात्र त्या सावित्रीसाठी वटपौर्णिमेला उपवास धरला जातो, वडाच्या झाडाला सात फेरे मारले जातात. मात्र ज्या ज्योतिबाची सावित्री सगळ्यांनी पाहिली तिच्यासाठी आराधना करण्याची गरज आहे. महिलांनी उपवास आराधना करताना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला देखील त्यांनी दिला.प्रास्ताविकात अॅड. महेश शिंदे यांनी माळी समाज संपूर्ण महाराष्ट्रात उद्योग-व्यवसाय निमित्त विखुरला गेला आहे. आधुनिक काळात प्रत्यक्ष गाठीभेटीचे प्रमाण कमी झाल्याने मुला-मुलींचे विवाह जुळविण्यास अडचणी येत आहे. तर घटस्फोटीत, विधवा, विधूर, दिव्यांग, विना आपत्य-आपत्य अशा इतर अनेक कारणांनी योग्य जोडीदार न मिळाल्याने अनेक कुटुंबांना विवाहाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत असून, या वधु-वर मेळाव्याच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.या मेळाव्यात सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रा. स्वाती सुडके, कवियत्री विद्या भडके, सामाजिक कार्यकर्ते अशोक भालके महेश भनभने, गणेश बनकर, विठ्ठलराव होले यांना रुपालीताई चाकणकर यांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात आले. या वधु-वर मेळाव्यास जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातून समाज बांधव एकवटला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. सुनिल महाराज तोडकर यांनी केले. आभार मंगल भुजबळ यांनी मानले.

# रावणदहन बंद करा
## आदिवासी समाजाची मागणी

माजरी - दसऱ्याच्या दिवशी रावणाच्या प्रतिमेचे दहन करण्यास माजरी परिसरातील आदिवासी समाज बांधवासह विविध गावातील सरपंच, ग्रा. पं. सदस्यांनी विरोध केला आहे. तर कुणी रावण दहन केल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक , उपविभागीय अधिकारी वरोरा, वेकोलिचे मुख्य महाप्रबंधक, माजरीचे ठाणेदार यांच्याकडे केली आहे.हजारो वर्षांपासून रावण दहनाची प्रथा सुरू आहे. सत्याचा असत्यावर विजय या अर्थाने दरवर्षी दसऱ्याला रावणाच्या प्रतिमेचे दहन केले जाते. मात्र मागील वर्षीपासून आदिवासी समाज या प्रथेला विरोध करीत आहे. राजा रावण हा विविध गुणांचा समुच्चय आहे. तो संगीत तज्ञ, राजनीतीज्ञ, उत्कृष्ट शिल्पकार, आयुर्वेदाचार्य, विवेकवादी होता. इतके असताना त्यांच्या प्रतिमेचे दहन करून त्यांना व त्याच्या गुणांना अपमानित करणे चुकीचे आहे, असे आदिवासी समाजाने म्हटले आहे.रामायण आणि पुराणांमध्ये कुठेही रावणाचे चरित्र वाईट अर्थाने नोंदविलेले नाही. उलट ज्ञानी, संस्कृत पंडित, बलवान, न्यायी राजा असाच रावणाचा उल्लेख आढळतो. त्यामुळेच देशात काही ठिकाणी रावणाची मंदिरे आहेत व आदिवासी समाज रावणाला आपला मोठा भाऊ मानतो. रावणदहन करणे म्हणजे बहुजन समाजाची भावना दुखावणे आहे. त्यामुळे ही प्रथा तातडीने बंद करावी व रावण दहन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असेही त्यांनी पत्रकात म्हटले आहे.दरम्यान दशऱ्याच्या दिवशी रावण यांचा पुतळ्याचे दहन करणाऱ्या व्यक्तीवर व मंडळावर भादवि १८६० अंतर्गत कलम १५३, १५३(अ ), २९५, २९५(अ ), २८९ मुंबई पोलिस कायद्यानुसार १३०,१३४,१३५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी आदिवासी समाजाचे संघटक तथा माजी पं. स. सदस्य चिंतामण आत्राम यांच्यासह आदिवासी समाज व अनुसूचित जनजातीच्या विविध संघटनेने निवेदनातून केली आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी आयुष नोपाणी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी माजरी पोलीस स्टेशन येथे दोन्ही पक्षाची बैठक घेण्यात आली होती. दरम्यान दोन्ही पक्षांनी आप-आपली भूमिका मांडली. दोन्ही पक्ष आपापल्या भूमिकेवर ठाम असल्याचे बैठकीत निदर्शनात आले. दरम्यान सोमवारी उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या दालनात दोन्ही पक्षाची बैठक लावण्यात आली. बैठकीत रावणाच्या पुतळ्याला न जाळता एक मुखी पुतळ्याचा दहन होणार. आणि त्या पुतळ्यामध्ये रावणाचा कुठलाही उल्लेख राहणार नाही असा निर्णय झाला.
– अजितसिंग देवरे, ठाणेदार माजरी

रावण दहन समितीकडून मागील तीस वर्षांपासून रावण दहन कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमातून कोणत्याही धर्माच्या भावना दुखावणे असा उद्देश नसून, बुराई पर अच्छाई की जीत या उद्देशाने पुतळ्याचे दहन करण्यात येत आहे.
– एम. पी. राव, अध्यक्ष –रावण दहन समिती

# ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन





**ठाणे**– संकल्प चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल ह्या शाळेत शुक्रवारी १३ ऑक्टोबर रोजी प्राथमिक आणि माध्यमिक सर्व वयोगटांसाठी वेशभूषा स्पर्धा, एकल नृत्य,एकल गायन,क्ले मोल्डिंग,पोस्टर मेकिंग,संस्कृत श्लोक पठण स्पर्धा, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनविणे, चित्रकला स्पर्धा, स्टोरी टेलिंग, मोनो अकटिंग, आणि जनरल नॉलेज प्रश्नमंजुषा अशा विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्या स्पर्धेत ठाण्यातील २० शाळांमधील विद्यार्थी सहभागी होऊन त्यांनी शाळेचे प्रतिनिधित्व केले.

ह्या स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील अतिशय पारंगत असे परीक्षक मान्यवरांना आमंत्रित करण्यात आले होते. यातील श्लोक पठण स्पर्धेचे परीक्षण लेखिका, कवयित्री आणि जोशी बेडेकर महाविद्यालयातील प्रा. प्रज्ञा पंडित यांनी केले. या स्पर्धेचे संयोजन अध्यापिका व ठाण्यातील प्रसिद्ध गायिका तसेच निवेदिका प्राजक्ता जोशी यांनी केले. या वेळी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, संस्कृत भाषेचे महत्त्व आणि संस्कृत भाषेतील स्तोत्र, मंत्र, प्रार्थनेचे महत्त्व या विषयावर भाष्य केले. संस्कृत श्लोक पठणामुळे उच्चार स्पष्ट होण्यास मदत होते, वाणी शुद्धी होते, मानसिक तसेच शारीरिक स्वास्थ्य वाढते तसेच स्मरणशक्ती देखील तल्लख होण्यास मदत होते, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनातील सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त अशा स्पर्धांचे आयोजन ऑक्सफर्ड इंग्लिश शाळेच्या प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका रेखा पाटील, माध्यमिक विभाग मुख्याध्यापिका पद्मजा कुलकर्णी,माध्यमिक विभाग परिवेक्षक (सुपरवायझर) मारिया अरासी आणि संपूर्ण कार्यकारी मंडळाने केले आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल ही शाळा विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सतत झटत असते. संकल्प चॅरिटेबल ट्रस्ट चे संस्थापक फाटक साहेब आणि संचालिका जयश्री फाटक यांच्या प्रोत्साहनामुळे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम रीतीने शाळेत आयोजिले जाणारे हे सर्व उपक्रम यशस्वी होत आहेत असे मत प्रा.पंडित यांनी यावेळी व्यक्त केले.

## राजे अंब्रिशराव आत्राम यांनी घेतले दुर्गा मातेचे दर्शन

# मुलचेरातील विविध दुर्गा मंडळांना दिली भेट

**मुलचेरा | प्रतिनिधी**

तालुक्यात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दुर्गा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केले जात आहे.२२ ऑक्टोबर रोजी अष्टमी निमित्ताने माजी राज्यमंत्री राजे अंब्रिशराव आत्राम यांनी मुलचेरा तालुक्यातील विविध गावांतील दुर्गा उत्सवात हजेरी लावून दुर्गा मातेचे पूजा करत दर्शन घेतले.

मुलचेरा तालुक्यात पुनर्वसित बंगाली बांधवांची मोठी संख्या असून तालुक्यातील विविध गावात दुर्गा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केले जाते.या वर्षी सुद्धा आकर्षक दुर्गा मूर्तीचे प्रतिष्ठापना करत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.विशेष शुक्रवारी दुर्गा उत्सवाला सुरुवात झाली असून दशमी पर्यंत हा उत्सव सुरू राहणार आहे.पाच दिवसांच्या उत्सवात परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने हजेरी लावत विविध कार्यक्रमांचा लाभ घेतात.माजी राज्यमंत्री राजे अंब्रिशराव आत्राम यांनी हरिनगर,गोमनी आंबटपल्ली,सुंदरनगर,मूलचेरा, देशबंधूग्राम या गावातील दुर्गा उत्सव मंडळांना भेट देऊन दुर्गा मातेचे आशीर्वाद घेतले.एवढेच नव्हेतर मंडळांच्या सदस्यांसोबत चर्चा करत आयोजित कार्यक्रमांची रूपरेषा जाणून घेतली आणि स्वतः या विविध कार्यक्रमासाठी लागणाऱ्या खर्चात हातभार लावला तसेच यापुढेही आर्थिक मदत लागल्यास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.यावेळी युवा नेते अवधेशबाब आत्राम,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे,सामाजिक कार्यकर्ते संतोष भाऊ उरेते, माजी प स सदस्य सुभाष गणपती,जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश दत्ता,तालुका अध्यक्ष संजीव सरकार,तालुका उपाध्यक्ष विजय बिश्वास,जिल्हा सचिव बादल शाह,महामंत्री अशोक बडाल, उपसरपंच तपन मल्लिक,नगरसेवक दिलीप आत्राम, ग्रामपंचायत सदस्य शुभम शेंडे,संजू पुरकलवार,किशोर मल्लिक तसेच कार्यकर्ते व गावकरी,महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**दुर्गा उत्सव मंडळांकडून जल्लोषात स्वागत**

**माजी राज्यमंत्री राजे अंब्रिशराव आत्राम यांचा मुलचेरा तालुक्यात प्रवेश होतच येथील दुर्गा उत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले.यावेळी त्यांनी मंडळाचे पदाधिकारी व उपस्थित गावकऱ्यांना नवरात्री निमित्त शुभेच्छा दिले.विविध ठिकाणी सुरू असलेल्या कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.**

## कुलथा घाटावर रेतीतस्करांचा मोठा धुमाकूळ

## महसूल प्रशासनाची मिलीभगत..?

**गोंडपिपरी | सुरज माडुरवार**

मागील वर्षी कुलथा रेती घाटाचा लिलाव झाला होता.लिलावाचा कालावधी देखील संपला.मात्र अजूनही त्या रेतिघाटावर रेती तस्करांचा सुळसुळाट सुरू आहे.

घाटावरील लिलावधारकाचे अनेक रेती वाहतूक परवाने शिल्लक असून शासनाकडे जप्त आहे.अनेक घाटावरील रेती साठा मात्र संपला आहे.शिल्लक रेती परवाना असल्याने शासनाला वाढीव मुदतीसाठी मागणी केली असून अवैध रेतीसाठा जमा करणे सुरू आहे.परिसरातील ३० ट्रॅक्टर लावून नदीपात्रातून रेतीचे उतखणन रोज सुरू आहे.कुलथा घाटाच्या व तालुक्यातील रेतीला मोठ्या प्रमाणात मागणी असून जिल्ह्यातील रेतीतस्कर सक्रिय झालेले दिसत आहे.लिलाव कालावधी संपल्यावर देखील घाटाला पोखरून शेकडो ब्रास रेतीसाठा जमा करण्यात येत आहे.रोज ३० ट्रॅक्टर घाटावर चालत असून प्रशासनाला कुठलीही माहिती नसल्याने प्रशासनाची मिलिभगत आहे का अशी चर्चा नागरिकांत असून जमा रेतीसाठ्याचे मोजपाप करून रेती जप्त करून घरकुल धारकांना रेती उपलब्ध करून घ्यावे.सोबतच रेती तस्करी रोखण्यासाठी लिलाव झालेल्या मुदत संपलेल्या घाटचालकांना वाढीव मुदत न देण्याची मागणी होत आहे.




## अजय कंकडालवार यांच्या हस्ते सभामंडपाचे उद्घाटन

**एटापल्ली | प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय येमली अंतर्गत येत असलेल्या कोंदावाही येथे सभामंडप नसल्याने अडचण भासत होते.कोंदावाही नागरिकांकडून अजय कंकडालवार यांना माहिती देताच, अजय कंकडालवार यांनी १५वितआयोग जिल्हा परिषद अंतर्गत नवीन सभामंडपाचे बांधकाम मंजूर करून दिले.आज बांधकाम पूर्णत्वास आल्यामुळे माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.याउद्घाटन समारंभ प्रसंगी कोंदावाही वासियांनी कंकडालवार यांचा पारंपारिक पद्धतीने ढोल ताशाच्या गजरात आदिवासी नूत्या सह जंगी स्वागत केले .

येथील सभामंडप मिळल्याने कोंदावाही येथे समस्त नागरिक अजय कंकडालवार यांचे आभार मानत उदघाटनाचे कार्यक्रम संपन्न झाले माजी जि.प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी कोंदावाही येथील प्रत्येक समस्या बाबत चर्चा करून आपल्या समस्या लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले.याकार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आविसंचे सरसेनापती नंदू नरोटे होते.आविसं-अजय मित्र परिवारचे एटापल्ली तालुका सचिव प्रज्वल नागुलवार ,नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,अजय गावडे पो.पा.उडेरा,रमेश वैरागडे ग्रा.पं.सदस्य गेदा,बालाजी ठाकरे,विलास गावडे सरपंच,नीलेश वेलादी सरपंच,प्रमोद आत्राम सरपंच,दोलु तलंडी, प्रकाश वेलदी,बिछू गावडे,रेनु तलांडे,गणेश गावडे सदस्य,श्रीनिवास बिरमवार,मनोज तलांडे माजी सरपंच,महेश बिरमवार,संतोष बिरमवार,कोलु तलांडे,बापू गावडे उपसरपंच,चंदुजी गावडे पो.पा.दानु तलांडे,राजुजी गावडे पो.पा.विजय दुर्गे,वैभव डोनारकर,महारू तलांडे,लचू तलांडे,विनोद हीचाम,मिलिंद भांडेकर,नरेंद्र गर्गम,राकेश सडमेक ,संदिप कोरेत,राकेश सडमेक सह आविसं अजय मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील पुरुष-महिला उपस्थित होते.



## कोरपना येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्या नगरपंचायतीला हस्तांतरित करण्याबाबत ठराव संमत

### नगराध्यक्ष नंदा बावणे यांचा पुढाकार ; जिल्हा परिषदेच्या मंजुरीकरिता ठराव संमत

**कोरपना | प्रतिनिधी**

१७ जून २०१५ ला नगर पंचायत कोरपनाची स्थापना झाली. नगर पंचायत कोरपना क्षेत्रातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व अंगणवाड्या जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असून शाळेची अवस्था अत्यंत दैयनिय आहे. त्यामुळे सदरील शाळांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने व मुलांचे शैक्षणिक भविष्य सुधारण्यासाठी सदर जि.प. शाळा व अंगणवाड्या नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करण्यासाठी नगराध्यक्षा नंदा बावने यांनी नगरपंचायतीकडून ठराव पारित करून घेतला. नगर पंचायत अंतर्गत शाळा सुरू झाल्यास झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेला भौतिक व शैक्षणिक सुधारणा करणे शक्य होईल. त्यामुळे चांगले शिक्षण मिळून गरीब मुलांचे शैक्षणिक भविष्य सुधारण्यास मदत होईल हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन नगराध्यक्षांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात येणार असून जिल्हा परिषद यावर काय निर्णय घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगर पंचायतचे उपाध्यक्ष इस्माईल शेख, आरोग्य व शिक्षण सभापती निसार एजाज शेख, महिला व बालकल्याण सभापती देविका रामदास पंधरे, म.बा.क. उपसभापती ज्योत्स्ना कवडु खोबरकर, नगरसेवक नितीन विजयराव बावणे, नगरसेविका मनिषा प्रशांत लोडे, आरीफा रमजान शेख, राधीका कवडु मडावी, लक्ष्मन पंधरे, मोहमद शेख इत्यादी नगरसेवकांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले. विरोधी बाकावर बसलेल्या नगरसेविका गिता अशोक डोहे, वर्षा राजु लेडांगे, आशा झाडे, सविता तुमराम, सुभाष हरबडे, स्वीकृत नगरसेवक किशोर बावने यांनी सदर विषयाचा विरोध केला.



**शाळेची इमारत धोकादायक व जीर्ण झाली असल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे शाळा बाधित झाल्या आहे. अपुऱ्या भौतिक सुविधा, विद्यार्थीसंख्येत दिवसेंदिवस घट होत असल्याने शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहे. म्हणून येणाऱ्या दिवसांत जर नगरपंचायतीला शाळा हस्तांतर झाल्यास शाळेचा कायापालट होईल.**

**– नितीन विजयराव बावणे, नगरसेवक**

## मराठी प्राध्यापक परिषदेच्या पदाधिकारी यांची पीडब्ल्यूएस कॉलेजला भेट



**नागपूर | प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेचे ३४ वे अधिवेशन पी.डब्ल्यू.एस. कॉलेज नागपूर येथे जानेवारी महिन्यात संपन्न होणार आहे. या दोन दिवशीय अधिवेशनाच्या निमित्ताने विशेष सभा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सभेला प्राध्यापक परिषदेचे सल्लागार डॉ. सत्यवान मेश्राम, अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, अधिवेशनाचे विद्यमान अध्यक्ष प्रा.श्रीकांत नाकाडे, संजय निंबेकर, मराठी विभाग प्रमुख डॉ. मनिषा नागपुरे, डॉ. संगीता मासुरकर व अन्य मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अधिवेशनाचे आयोजन प्रामुख्याने जानेवारी महिन्यात करावे असे ठरविण्यात आले असून परिषदेच्या अनुषंगाने इतरही महत्वपूर्ण बाबींवर चर्चा करण्यात आली. यावेळी प्राध्यापक परिषदेतर्फे प्रसिद्ध झालेली अध्यापनाची विचारसूत्रे (मराठी प्राध्यापक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणाचा संग्रह) आणि संवादिनी ( मराठी प्राध्यापकांचा परिचय संग्रह) प्राचार्य व ग्रंथपाल यांना महाविद्यालयासाठी भेट देण्यात आले.

## सख्ख्या बहिण भावाचा एमपीएससी परीक्षेत डंका

**गडचिरोली | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी या पदासाठी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेचा निकाल नुकतेच २० ऑक्टोबर रोजी जाहीर झाला असून एकाच घरातील सख्ख्या बहीण भावंडांनी यात घवघवीत यश प्राप्त केला आहे.डॉ. निशिगंधा नैताम आणि डॉ.शुभम नैताम असे त्या बहीण भावाचे नाव असून ते आरमोरी येथील रहिवासी आहेत.आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यातील सख्ख्या बहीण भावांना एकाच वेळी पशुधन विकास अधिकारी होण्याचा बहुमान मिळाल्याने त्यांच्यावर जिल्हाभरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

डॉ.निशिगंधा नैताम आणि डॉ.शुभम नैताम यांचे वडील देविदास सीताराम नैताम हे जवाहरलाल नेहरू महाविद्यालय,जोगीसाखरा (ता.आरमोरी) येथे लिपिक या पदावर कार्यरत आहेत.त्यांना तीन अपत्य असून मोठ्या मुलीचा लग्न झाला आहे.तर, डॉ निशिगंधा नैताम यांनी खाजगी कंपनीत नौकरी करताना तर शुभम नैताम यांनी शिक्षण घेताना एमपीएससी परीक्षा पास केली आहे.डॉ.निशिगंधा नैताम हीचे प्राथमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालय, आरमोरी आणि अकरावी व बारावीचे शिक्षण महात्मा गांधी कनिष्ठ विद्यालय,आरमोरी येथेच झाला. नंतर त्यांनी ग्रॅज्युएशनसाठी नागपूर गाठले व वेटेरीनरी कॉलेज,नागपूर येथे पूर्ण केले.तर, त्यांनी पोस्ट ग्रॅज्युएशन पशुवैद्यकीय व पशूविज्ञान महाविद्यालय, परभणी येथून पूर्ण केले. त्यानंतर २०२०-२१ या कालावधीत त्यांनी वेटेरीनरी ऑफिसर म्हणून गुजरात राज्यात काम केले. २०२१ पासून ते आतापर्यंत ते कर्नाटक राज्यातील बिदर वेटेरीनरी कॉलेज मध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करत होते.डॉ.निशिगंधा नैताम हिचा भाऊ डॉ. शुभम नैताम यांचा १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण लिटल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट,आरमोरी आणि ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण हितकरणी हायस्कूल,आरमोरी येथेच झालं. अकरावी आणि बारावीचे शिक्षण त्यांनी लालबहादूर शास्त्री कनिष्ठ विद्यालय,भंडारा येथे पूर्ण केला. तर,नागपूर वेटेरीनरी कॉलेज नागपूर येथे त्यांनी ग्रॅज्युएशन केले.पोस्ट ग्रॅज्युएशनचे शिक्षण त्यांनी उत्तर प्रदेश राज्यातील मथुरा येथील पंडित दीनदयाल उपाध्याय गो अनुसंधान विद्यालय, दुवासू येथे पूर्ण केले. त्यानंतर दोघांनी २२ डिसेंबर २०२२ मध्ये एमपीएससी परीक्षा दिली.५ सप्टेंबर २०२३ रोजी मुलाखत झाली आणि त्याचा निकाल २० ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारच्या सुमारास जाहीर झाला.यात दोघांनाही घवघवित यश मिळालं.





**गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थी कुठल्याही क्षेत्रात कमी नाहीत. मात्र,त्यांना योग्य दिशा आणि मार्गदर्शन मिळाल्यास ते पुढे जाऊ शकतात.अभ्यासात जिद्द आणि चिकाटी असलं की सगळं काही शक्य आहे.प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास यश संपादन करता येणार.**

**डॉ.निशिगंधा देविदास नैताम,आरमोरी**

## महिलेचा बळी घेणारी टी-१३ वाघीण जेरबंद

**गडचिरोली | प्रतिनिधी**

आरमोरी तालुक्यात मागील पंधरा दिवसांपासून धुमाकूळ घालणाऱ्या नरभक्षक टी- १३ वाघिणीला मुलुरचक येथील सर्व्हे क्रमांक १२/१ मध्ये २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता जेरबंद करण्यात आले.

१९ ऑक्टोबरला रामाळा येथील शेतशिवारात ताराबाई एकनाथ धोडरे (५५) ही महिला धान कापण्याकरीता गेली असता सदरच्या टी- १३ वाघिणीने हल्ला करून ठार केले होते. तीला रेस्क्यू करण्याकरीता ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी (वन्यजीव) डॉ. रविकांत खोब्रागडे व शार्पशुटर अजय मराठे यांची चमू त्याच दिवशी आरमोरी परिक्षेत्रात दाखल झाली. वाघिणीला जेरबंद करण्यासाठी सापळा रचुन ट्रॅप कॅमेरा लावुन अवघ्या ३ दिवसात वाघिणीला पकडण्यात यश आले. वाघिणीला आता गोरेवाडा टी टी सी येथे नेण्यात येणार आहे. वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र रवि मधिल सर्व्हे क्रमांक १२/१ मध्ये वाघिणीला जेरबंद करण्यात आले.सदरची कार्यवाही वनसंरक्षक एस. रमेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी उपवनसंरक्षक धर्मविर सालविठ्ठल, सहाय्यक वनसंरक्षक संदिप भारती, परिविक्षाधीन वनपरिक्षेत्र अधिकारी पवनकुमार जोग, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश मेश्राम, क्षेत्र सहाय्यक राजेंद्र कुंभोर, अजय उरकुडे, पाटील, साखरे, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपुर येथील चमु मध्ये दिपेश टेंभुर्णे, योगेश लाकडे, गुरुनानक ढोरे, वसीम शेख, विकास ताजने, प्रफुल वाटगुरे, निकेश शेंदे, मनन शेख तसेच गडचिरोली ठठख चमुदलातील आशिष भोयर, अजय कुकडकर, मकसुद सय्यद, गुणवंत बावनथडे, पंकज फरकडे, निखील बारसागडे व इतर वनकर्मचारी उपस्थित होते.



## अहेरी येथे शहीद वीर बाबुराव शेडमाके यांचा पुण्यस्मरण दिनानिमित्त राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी वाहिली श्रद्धांजली



**अहेरी | प्रतिनिधी**

१८५७ चा स्वातंत्र संग्रामातील महानायक, शहीद वीर बाबुराव शेडमाके यांचा पुण्यस्मरण दिनानिमित्त जय पेरसापेन गोंड समाज, अहेरी तर्फे शहीद विर बाबुराव चौक, अहेरी येथे काल आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहून माजी पालकमंत्रीराजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी वीर बाबुराव शेडमाके यांचा प्रतिमेचे तथा सल्ला गागराचे पूजन करीत आदरांजली वाहिली शहीद वीर बाबुराव शेडमाके यांनी ह्या देशासाठी अगदी कमी वयात आपल्या प्राणाची आहुती दिली, त्यांचे बलिदान कदापी विसरता येणार नाही, आदिवासी समाजाने त्यांचे स्मरण करून प्रत्येक क्षेत्रात आपली प्रगती करावी हीच त्यांचा प्रती खरी श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन ह्यावेळी राजेंनी केले, ह्यानंतर अहेरी शहराच्या मुख्य मार्गाने राजेंच्या उपस्थितीत भव्य रॅली काढण्यात आली, ह्या कार्यक्रमासाठी जय पेरसापेन गोंड समाज तथा शहीद विर बाबुराव स्मारक समिती अहेरीच्या पदाधिकारी तथा सदस्यांनी परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .